रोपांद्वारे लागवड कशी करावी ?

शेताची चांगल्या प्रकारे मशागत झाल्यानंतर साध्या पध्दतीने पाच फुट अंतरावर मध्यम खोलीची सरी काढून घ्यावी. या सरीमध्ये उपलब्ध असलेले कुजलेले शेणखत, मळी, कारखान्याची राख, कंपोस्ट खते टाकावे. एकरी पत्येकी तीन किलो ॲझेटोबॅक्टर, स्फुरद विरघळविणारे जीवाणू व पालाश उपलब्ध करणारे जीवाणू मिसळून घ्यावेत. तर ठिबक सिंचन पध्दतीने केल्या जाणाया लागवडीसाठी पाच फूट अंतरावर सोळा ते अठरा एमएम जाडीची उपनळी टाकावी. हलक्या ते मध्यम जमिनीत चाळीस सेंटीमीटर अंतरावर ताशी चार लिटर पाणी टाकणारा इनलाईन ड्रीपर असावा. तर भारी जमिनीत पन्नास सेमी अंतरावर ताशी ४ लिटर पाणी टाकणारा इनलाईन ड्रीपर असावा. रोपांची लागवड करण्यापूर्वी ठिबक सिंचन चालवावा म्हणजेच मध्यम ते हलक्या जमिनीत एकरी ५० हजार लिटर पाणी तर भारी जमिनीत ४४ हजार लिटर पाणी द्यावे. वाफसा आल्यानंतर कुदळीने दोन फूट अथवा अडीच फूट अथवा तीन फूट अंतरावर गल घेऊन रोपांची लागवड करावी. यानंतर दिवसातून एक वेळ दोन तास ठिबक सिंचन प्रणाली चालू ठेवावी. चौथ्या दिवसापासून आठ किलो युरिया, अर्धा किलो फॉस्फेरिक ॲसिड, चार किलो पोटॅश ठिबक सिंचनातून आठवड्यातून एकदा सोडावे.

ऊस रोपे लागवड करताना काय काळजी घ्यावी ?

- जमिनीची योग्य प्रकारे मशागत करावी. दोन नांगरटी , एक कुळवणी, डिस्क हॅरो(तव्यांचा कुळव) कुळवणी, सबसॉईलरने नांगरट करावी.
- पाचफूट अंतरावर मध्यम खोल सरी काढावी.
- ठिबक सिंचनाची उपनळी प्रत्येक सरीमध्ये टाकून जमीन ओली करावी.
- वाफसा आल्यावर कुदळ, काठीच्या सहाय्याने दहा सें.मी खोली एवढा खड्डा / गल घ्यावी.
- ट्रेमधील रोपांना हलक्या पाण्याची फवारणी करुन, प्रत्येक रोप अलगद उचलून खड्ड्यामध्ये लावावे, चोहाबाजूस माती दाबावी.
- सर्व रोपे लागवड केल्यानंतर ठिबक सिंचन १ ते दीड तास चालवावे.
- ऊसाच्या रोपांचा ट्रे राखून ठेवावा जेणेकरून १ ते २ टक्के होणाऱ्या रोपांचा मर सांधता येईल.
- चौथ्या दिवसापासून फर्टिगेशन चालू करावे.
- लागवडीपासून २१ दिवसाच्या आत १)ह्युमिक ॲसिड २)जीवाणू खते-ॲझेटोबॅक्टर, स्फुरद विरघळविणारे जीवाणू, पालाश उपलब्ध करणारे जीवाणू प्रत्येकी रोप एक लिटर तसेच कार्बेन्डेझिअम २०० ग्रॅम १०० लिटर पाणी यांचे आळवणी करावे किंवा ठिबक सिंचनाद्वारे द्यावे.

लेख संकलन

श्री. विवेक भोईटे
विषय विशेषज्ञ (मृदा शास्त्र),
कृषि विज्ञान केंद्र, बारामती

डॉ. सय्यद शाकीर अली
प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ,
कृषि विज्ञान केंद्र, बारामती

Agricultural Development Trust Baramati

ऊस
रोपांद्वारे लागवड

निर्मिती अर्थसहाय्य :

प्रकल्प संचालक आत्मा, पुणे

कृषि भवन, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५
फोन :०२०– २५५३०४३१
E-mail : pdatmapune@gmail.com

तांत्रिक लेखन व प्रकाशन:

कृषि विज्ञान केंद्र, बारामती

माळेगांव खुर्द, बारामती, पुणे – ४१३ ११
फोन :०२११२-२५५२०७, २५५२२७
E-mail:kvkbmt@yahoo.com
Web: www.kvkbaramati.com

ऊसाची रोपाने केलेली लागवड

दरवर्षी ४० हजार कोटींची उलाढाल होणारा, राज्यातील १ कोटी लोकसंख्या अवलंबून असलेला साखर उद्योग महाराष्ट्राची शान मानला जातो. आज राज्यात थोडया थोडक्या नव्हे तर १०.२२ लाख हेक्टर क्षेत्रावर ऊसाची लागवड प्रतिवर्षी होते. ऊसाचे पीक आडसाली म्हणजे तब्बल दीड वर्ष शेतात राहते. थोडक्यात दरवर्षीनुसार लागवडीचे व गाळपाचे येणारे असे मिळून २० लाख हेक्टरहून अधिक ऊसाचे क्षेत्र आहे.

ऊस शेतीमध्ये आता आधुनिक तंत्र येत आहे. या तंत्राचा चांगला फायदा शेतकयांना झाला आहे. आता पुढचे पाऊल म्हणजे ऊसाच्या कांडयांची नव्हे, तर थेटऊसाच्या रांपांचीच लागवड करायची आहे. ही लागवड अनेक अर्थी व कित्येक पटींनी शेतकयांसाठी नवसंजीवनी ठरणार आहे.

रोप लागवडीचे फायदे :

- रोपांद्वारे लागवड केल्यामुळे ९८ ते १०० टक्के उगवण क्षमता पर्यायाने शेतात तूट राहत नाही.
- १ ते १.५ महिना ऊसाचे शेत मशागतीसाठी किंवा कमी कालावधीच्या पिकासाठी वापरता येते.

- आडसाली अगर पूर्वहंगामी ऊसाची लागवड करताना जास्तीचा पाऊस असल्यास जमीन वाफशावर नसल्यास दीड महिन्यापर्यंत रोपांद्वारे लागवड करता येईल.
- लागवडीच्या ऊसामध्ये तूट नसल्यामुळे खोडवा पिकामध्ये तूट सांधावी लागत नाही, खोडव्याचे उत्पादन वाढीसाठी मदत होते.
- गाळप योग्य ऊसाची संख्या जास्त मिळते.



- प्रत्येक ऊसाचे वजन व प्रतवारी वाढते.
- लागवडीवेळी दोन ओळीतील व दोन रोपातील अंतर योग्य राखल्यामुळे प्रत्येक ऊसाला, बेटाला सर्व बाजुंनी सूर्यप्रकाश, मोकळी हवा, अन्नद्रव्यांची उपलब्धता सारख्या प्रमाणात मिळते.
- निरोगी रोपांमुळे कीडग्रस्त व रोगग्रस्त ऊस, ऊसाची बेटे तयार होत नाहीत.
- दोन रोपातील अंतर जास्त असल्यामुळे व रोप लागण करताना पाने कापल्यामुळे (जेठा कोंब) फुटवे जास्त व एकाच वेळी येतात.
- फुटवे एकसारखे, जोमदार येतात त्यांची वाढहा एकसारखी होते.
- उत्पादन खर्चात बचत होते.

ऊसाच्या रोपांचीच लागवड का ?

आतापर्यंत व सध्याही प्रचलित असलेली लागवड ही ऊसाची टिपरी, एक डोळा, तीन डोळे अशा स्वरुपात आहे. या पध्दतीची लागवड करताना शेतकरी एका एकरातून अधिकाधिक ऊस मिळावा म्हणून दोन टिपयात एक फूट अंतराची शिफारस असताना प्रत्यक्षात समोरासमोर म्हणजे टक्कर पध्दतीचे, सवाई

पध्दतीचे लागवड करत असे. त्यातून खर्चही वाढतो. आताच्या ऊसाला प्रचलित मिळणारा भावा पाहता, लागवडीसाठी प्रतिएकरी तीन ते चार टन बियाणे वापरणे हे परवडणारी बाब नाही. त्याचप्रमाणे लागवड करण्याचाही खर्च मोकळयात वाढणारा आहे. निसर्गाच्या लहरीपणावर मरत करुन ऊसाचे उच्चांकी उत्पादन काढण्यासाठी ठिबक सिंचनावर रोपांच्याद्वारे लागवड करुन एकरी १०० टक्के रोपांची लागवड खूप फायदेशीर ठरणार आहे.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे टिपरीद्वारे केलेली लागवड ही अनेकदा लागवडीनंतर उगवण न झाल्याने पुन्हा सांधावी लागते. त्यातून आणखी खर्च वाढत जातो. शिवाय सांधलेल्या उसाची मूळ ऊसाशी बरोबरी करण्यात खूप वेळ लागतो. त्याउलट रोपे आयती असल्याने त्यांची उगवण क्षमताचांगली असल्याने व लागवडीनंतर उगवून रोपे मोठी होण्याचा वेळ वाचण्यासाठी रोपांची लागवड खूपच फायदेशीर ठरते. रोपांद्वारे केलेली लागवड ही पांढया मुळयांची चांगली वाढ होण्यासाठीही फायदेशीर ठरते. शिवाय लागवड करताना अलीकडे मजुरांचा वाढलेला खर्च लक्षात घेता, निरोगी व उत्तम प्रतीची रोपे शेतकयाचे एक कुटुंब घरच्या घरी लागवड करु शकते. निरोगी व उत्तम प्रतीची रापे शेतकयांनाही तयार करता येऊ शकतात.